# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**विषय :- अर्थसंकल्पीय तरतूदीचे पुनर्विनियोजनास मान्यता देणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा○ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१६/१/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि. १६/१/२०२३ पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक शौचालय,मुता-या बांधणे | रु. ५०.०० लक्ष | रु.४९.९७ लक्ष | रु. ०.०३ लक्ष |
| | एकूण | रु. ५०.०० लक्ष | रु.४९.९७ लक्ष | रु. ०.०३ लक्ष |

सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये वरील लेखाशिर्षामध्ये निधीची कमतरता आहे. खालील विषयांकित कामे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत करावयाची आहेत. त्याकरीता ४९.९८ लक्ष खर्च होणार आहे. पैकी शासनाकडील प्राप्त अनुदानातुन रु.३९.२० लक्ष निधी उपलब्ध आहे. मात्र उर्वरित रक्कम रु.१०.७८ लक्ष मनपाच्या सार्वजनिक शौचालय,मुता-या बांधणे या लेखाशिर्षामधून करणेकरीता शिल्लक नाहीत. सदरचे काम या आर्थिक वर्षात झाले नाही तर मार्च २०२३ नंतर शासनाचा निधी वापरता येणार नाही. तरी खालील कामांकरीता मनपाच्या निधी मधून रु.१०.७८ लक्ष रुपये उपलब्ध करुन वरील लेखाशिर्षामध्ये खालील कामांकरीता अग्निशमन केंद्र बांधणे या लेखाशिर्षामधुन रु.१०.७८ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| १. प्रभाग समिती क्र.०३ वार्ड क्र. २२ (विनायक नगर) मध्ये असणारे शौचालय धोकादायक झाले असून निष्कासित करुन नविन बनवून मिळण्याबाबत. | रु. २४,९८,८२२/- | सदर कामाकरीता शासनाकडील निधी रु.३९.२० लक्ष वापरण्यात येणार आहे. व मनपा निधी मधून रु.१०.७८/- लक्ष रुपये ची आवश्यकता आहे. म्हणून रु.१०.७८ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे. |
| २. वार्ड क्र.१६ मधील भावनाॠषी नगर,पद्मामानगर येथे नविन २० सीट शौचालय बांधणे बाबत. | रु. २४,९८,८२२/- | |
| एकूण | रु.४९,९७,६४४ | |

| अ. क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.२७/१/२०२३ पर्यत झालेला खर्च (सदरची रक्कम पुनर्विनियोजनाकरीता वापरणेत आलेली आहे) | दि. २७/१/२०२३ पर्यंतची शिल्लक | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | अग्निशमन केंद्र बांधणे | रु. १००.०० लक्ष | रु.८५.०० लक्ष | रु. १५.०० लक्ष | रु.१०.७८ लक्ष |
| | एकूण | रु. १००.०० लक्ष | रु.८५.०० लक्ष | रु. १५.०० लक्ष | |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३,व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो. व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांच्याकडे निहीत आहेत.

सार्वजनिक शौचालय,मुता-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये रु.१०.७८ लक्ष रुपये अग्निशमन केंद्र बांधणे या लेखाशिर्षामधून रु.१०.७८ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांनी दिनांक ९/२/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ९९

**दिनांक.** २८ **/०२/२०२३**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ३ मधील १) प्रभाग समिती क्र.०३ वार्ड क्र. २२ (विनायक नगर) मध्ये असणारे शौचालय धोकादायक झाले असून निष्कासित करुन नविन बनवून मिळण्याबाबत. व २) वार्ड क्र.१६ मधील भावनाऋषी नगर,पद्मानगर येथे नविन २० सीट शौचालय बांधणे. या दोन कामांकरीता मनपा निधी नसल्याने अग्निशमन केंद्र बांधणे या लेखाशिर्षामधून सार्वजनिक शौचालय,मुता-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये रु.१०.७८ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
o/c **भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**